# दि रीडिंग क्लब' उपक्रम अहवाल- कार्यक्रम क्र. ५

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

*'दि रीडिंग क्लब – वाचन कट्टा'* या उपक्रमांतर्गत दिनांक **१२ जुलै २०२५** रोजी लेखक **शाहू पाटोळे** लिखित *'अन्न हे अपूर्ण ब्रह्म : Dalit Kitchens of Marathwada'* या पुस्तकावर परिचयात्मक चर्चा आयोजित करण्यात आली. या चर्चेचे सादरीकरण **डॉ. सुनील भारोडकर**, शैक्षणिक संयोजक, राज्यशास्त्र यांनी केले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून विद्याशाखेचे संचालक **मा. प्रा. नागार्जुन वाडेकर** उपस्थित होते. या कार्यक्रमास शैक्षणिक संयोजक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.



डॉ. भारोडकर यांनी पुस्तकातील महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट करताना भारतीय आहारसंस्कृती आणि अन्नसंस्कृतीचे सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व उलगडले. त्यांनी मराठवाड्यातील खाद्यसंस्कृती, मांसाहार व शाकाहार, ग्रामसंस्कृतीतील आलुतेदार व बलुतेदार प्रथा, माध्यमांचा खाद्यसंस्कृतीवर होणारा परिणाम यावर चर्चा केली. पुस्तकात आढळणाऱ्या *"मांसाहार कुठून आला?"* या प्रश्नावरून बदलत्या आहार पद्धती व नैसर्गिक भाज्या, रानभाज्यांची ओळख याचे महत्व अधोरेखित केले. तसेच आहारसंस्कृती व जातिव्यवस्था यातील नातेसंबंध स्पष्ट करत पुस्तकातील अंतर्भूत सामाजिक संरचनेवर प्रकाश टाकला. या सादरीकरणादरम्यान पुस्तकातील विचारांवर संवादात्मक चर्चा व प्रश्नोत्तरे झाली. सहभागींनी आपले अनुभव आणि मतं व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी या चर्चेचे कौतुक करत दलित साहित्य, आहारसंस्कृती आणि सामाजिक वास्तव जाणून घेण्याची संधी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

एकूणच, *'अन्न हे अपूर्ण ब्रह्म : Dalit Kitchens of Marathwada'* या पुस्तकाच्या चर्चेने वाचनसंस्कृती, साहित्यिक जाणिवा आणि सामाजिक वास्तवाविषयी नवीन दृष्टिकोन निर्माण केला. वाचन कट्ट्याचा हा उपक्रम वैचारिक समृद्धी घडवणारा ठरला.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक *